PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Suwasini
Year: 1961

Song: Kirtichya Tujhya Vyatha
Lyricist: Ga. Di. Madgulkar

किर्तीच्या तुझ्या कथा
आ...
हृदयी प्रीत जागते
जाणता अजाणता
हृदयी प्रीत जागते
जाणता अजाणता
आ...
पाहीले तुला न मी
तरीही नित्य पाहते
लाजूनी मनोमनी
उगीच धुंद राहते
ठाऊका न मजसी जरी
निषद देश कोणता
हृदयी प्रीत जागते
जाणता अजाणता

दिवसरात्र ओढणी
या मनास लागते
तुझीच जाहल्यापरी
मी सदैव वागते
मैत्रिणीस सांगते
तुझी अमोल योग्यता
हृदयी प्रीत जागते
जाणता अजाणता
हृदयी प्रीत जागते
जाणता अजाणता

निमंत्रणा विना पुन्हा
हंस येई तो वनी
निमंत्रणा विना पुन्हा
हंस येई तो वनी
नादचित्र रेखितो
तुझेच मंद गुजनी
वेड वाढवून तो
उडून जाय मागुता
हृदयी प्रीत जागते
जाणता अजाणता
हृदयी प्रीत जागते
जाणता अजाणता

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*